CMYK

**श्रद्धेय भानुभाऊ शिंदे यांच्या जयंतीनिमित्त शेकडो रक्तदात्यांनी केले रक्तदान** >>पान 2

**बस-कारच्या भीषण अपघातात चार ठार** >>पान 3

**बांधकाम पूर्ण झालेल्या ट्रामा केयर सेंटरसाठी पद निर्मिती मंजूर करण्याची माजी आमदार संजय रायमुलकर यांची आरोग्य मंत्र्यांकडे मागणी** >>पान 4

# दैनिक आपला विदर्भ

**सुविचार**
दुसऱ्यांचे मत जाणून घ्या.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



**धुरंधरमध्ये रणवीर त्याच्यापेक्षा २० वर्षांनी लहान असलेल्या या अभिनेत्रीबरोबर करणार रोमान्स**
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 296 ■ मंगळवार, दि. 08 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# संजय शिरसाटांवर व्हिट्स हॉटेल प्रकरणावरुन सभागृहात गंभीर आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरच्या वेदांत म्हणजेच विट्स हॉटेलच्या लिलावावरून राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यावर आरोप करण्यात आले होते. संजय शिरसाट यांच्या मुलाने छत्रपती संभाजीनगरमधील विट्स हॉटेलच्या लिलाव प्रक्रियेत हॉटेलची बाजारभावानुसार किंमत ११० कोटी रुपये असतानाही, केवळ ६७ कोटी रुपयांत विकत घेतल्याचा आरोप केला जात होता. यानंतर संजय शिरसाट यांनी या टेंडर प्रक्रियेतून माघार घेतल्याचे जाहीर केले होते. आता विधान परिषदेच्या सभागृहात आज व्हिट्स हॉटेल टेंडर प्रकरणावरून मोठा गोंधळ झाला. या प्रकरणात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पुन्हा गंभीर आरोप केला. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची घोषणा केली आहे.**

## हॉटेल व्हिट्स प्रकरणी अंबादास दानवे आक्रमक: अखेर मुख्यमंत्र्यांनी दिले उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

अंबादास दानवे यांनी विधान परिषदेत बोलताना संजय शिरसाट यांचे चिरंजीव सिद्धांत शिरसाट यांनी नियम डावलून टेंडर प्रक्रियेत सहभाग घेतल्याचा आरोप केला. विशेष म्हणजे शिरसाट यांची कंपनी संबंधित काळात नोंदणीकृत नव्हती, तरीही त्यांनी टेंडर प्रक्रियेत भाग घेतला. अशा अवस्थेत ज्याच्यामुळे ते पात्र ठरले, त्या संबंधित अधिकाऱ्यावरही गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी दानवे यांनी केली. तसेच, या प्रक्रियेत बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. यावरून विरोधकांनी सभागृहात सभापती न्याय द्या! अशा जोरदार घोषणा



दिल्या, तर काही सदस्यांनी थेट शिरसाट यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली.

यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सगळी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. अशा प्रकरणात पारदर्शकता असणे महत्त्वाचे आहे. यासाठी या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी केली जाईल, असे सांगितले. यानंतर मंत्री संजय शिरसाट यांनी या आरोपांना प्रत्युत्तर देताना विरोधकांना सुनावले. दलाली करण्यापेक्षा ऐकून घ्या, अशा शब्दांत त्यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. मात्र, विरोधकांनी याला जोरदार आक्षेप घेतला. मंत्र्यांना अचानकपणे बोलण्याची परवानगी नाही, त्यासाठी आधी नोटीस दिली पाहिजे, असे म्हणत विरोधकांनी गोंधळ सुरु केला. संजय शिरसाट पुढे म्हणाले, माझं नाव सभागृहात घेतलं गेलं आहे, त्यामुळे मी उत्तर देण्यासाठी आलो आहे. काही लोक म्हणतात की १६० कोटी, २०० कोटींची खरेदी व्हायला हवी होती, असे त्यांनी म्हटले.

यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केलेले आहे की, सगळी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने प्रक्रिया करण्यात येईल. मंत्र्यांनी सुद्धा याबाबत खुलासा केलेला आहे. तथापि, अशा प्रकरणात पारदर्शकता असली पाहिजे म्हणून या संदर्भात अटी शर्ती किंवा इतर प्रक्रियेमध्ये कुठे अनियमितता झाली आहे का? याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

# एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू, २ चिमुल्यांसह पत्नीची शेतातील विहिरीत उडी



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर /प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने रविवारी अवघी पंढरी दुमदुमली होती, लाखो वैष्णवांचा मेळा पंढरीत जमला होता. टाळ, मृदुंगाचा गजर आणि विठु-माऊलींच्या जयघोषणाने अवघा आसमंत दुमदूमून गेला. पंढरीमुळे महाराष्ट्रात सळीकडे आनंदोत्सव होता. मात्र, त्याच पंढरपूर तालुक्यातून आज एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. कौटुंबिक वादातून पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे आषाढी एकादशी दिवशी २५ वर्षाची पत्नी मोनाली, सहा वर्षाचा मुलगा कार्तिक आणि चार वर्षाची म ुलगी प्रगती यांनी आपल्याच शेतातील विहिरीत आत्महत्या केली. मोनाली हिने आपल्या दोन मुलांना घेऊन विहिरीत उडी टाकल्याचे समजतात पती म्हमाजी याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याने पंढरपूरसह सोलापूर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच पंढरपूर तालुका पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कासेगावातील शेतात जाऊन या विहिरीतून मोनाली आणि तिच्या दोन चिमूरड्यांचे मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू केले आहे. घटना घडल्यापासून सातत्याने विहिरीतले पाणी उपसणे सुरू असून आत्तापर्यत फक्त ४ वर्षाचा मुलगा कार्तिक याचा मृतदेह सापडला आहे. बाकीचे मृतदेह शोधण्यासाठी पंढरपूरची आपत्कालीन यंत्रणा विहिरीत उतरून शोध घेत आहे. पंढरपूर तालुका पोलिसात याची नोंद झाली असून पुढील अधिक तपास पोलीस यंत्रणांकडून सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, या कुटुंबाचा प्रमुख असलेला आणि गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या म्हमाजी आसबे याचा मृतदेह पोलिसांनी खाली काढला. पती-पत्नीच्या कौटुंबिक वादातून ही धक्कादायक घटना झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे.

# ...त्यांच्याकडे उर बडवायला देखील माणसं नाहीत, उद्धव ठाकरेंची भाजपावर जोरदार टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे आणि शिवसेनेच्या (उबाठा) कार्यकर्त्यांची तुलना राज्याचे मंत्री आशिष शेलार यांनी पहलगाम येथील दहशतवाद्यांशी केली होती. यावर आता शिवेसना (उबाठा) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला असून, पहलगामचे दहशतवादी भाजपात गेले का? असा सवाल उपस्थित केलाय. उद्धव ठाकरे यांनी थेट भाजपच्या अस्तित्वावरच टीका केलीय. आज भाजपाकडे टीका करायला देखील मूळ भाजपामधील नेते नसल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलंय. अटल बिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण आडवाणी यांच्या काळातील मूळ भाजपा संपल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलंय. तसंच आज उर बडवायला देखील भाजपाकडे स्वतः ची माणसं नसल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केलीय.

'महाराष्ट्राचे मंत्री आणि भाजपा नेते आशिष शेलार हे मराठी भाषेचे शत्रू आहेत. ते आपल्या मराठी लोकांची तुलना दहशतवाद्यांशी करतायेत. हेच लोक आपल्या मराठीचे आणि आपल्या महाराष्ट्राचे मारेकरी आहेत. कारण, पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही. पहलगाममधील दहशतवादी भाजपामध्ये सामील झाले का? त्यांना अजून का पकडले गेले नाही? तुम्ही भारतातील हिंदूंचं रक्षण करू शकला नाही, हे लाजिरवाणे आहे, अशी



टीका उद्धव ठाकरे यांनी केलीय.

पुढं बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितलं की, ''जर कोणी काहीही करून भाजपामध्ये सामील झाला तर तो वॉशिंग पावडरनं स्वच्छ होतो. आमचा कोणत्याही भाषेला विरोध नाही. पण, कोणतीही भाषा जबरदस्तीनं लादणं योग्य नाही. मी देखील हिंदी बोलत आहे. आमचे खासदारही संसदेत हिंदी बोलतात. आमचे कोणाशीही वैर नाही. महाराष्ट्रात तुम्ही तिसरी भाषा म्हणून हिंदी लादत आहात मग उत्तर प्रदेशात तिसरी भाषा कोणती आहे?'' असा सवाल उद्धव ठाकरे यांनी सरकारला विचारला.

अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वातील मूळ भाजपा आता संपली आहे. ज्यांच्यासोबत आम्ही इतकी वर्ष युती केली होती. आज भाजपामध्ये जे लोक आहेत, ते अर्धे आमच्याकडचे, अर्धे काँग्रेसमधले, अर्धे राष्ट्रवादीतले आणि देशभरातील इतर पक्षांमधील लोकं आणि नेते आजच्या भाजपमध्ये आहेत. आज सत्तेत असलेल्यांनी मूळ भाजपाला मारले आहे. आज त्यांच्याकडे उर बडवायला देखील माणसं नाहीत. काही बाहेरील लोक येथे येऊन लोकांमध्ये द्वेष पसरवत आहेत,'' अशी टीका देखिल उद्धव ठाकरे यांनी केलीय.

## ''दलालांच्या पोटात अन्न जातेय, गरिबांच्या नाही'', रेशन तांदळाच्या गैरव्यवहाराबाबत नाना पटोले आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विविध मुद्द्यावरून तसंच सौरपंपाची सक्ती आणि विजेच्या प्रश्नावरून पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी सोमवारी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले.याचबरोबर, राज्यात होणाऱ्या भेसळयुक्त तेल आणि रेशन तांदळाच्या गैरव्यवहाराबाबत विरोधक विधानसभेत आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. तारांकित प्रश्नावरुन आज सभागृहात विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. तारांकित प्रश्नांमध्ये भंडारा जिल्ह्यात रेशनाच्या तांदळात होत असलेल्या गैरव्यहाराबद्दल प्रश्न विचारण्यात आला.

# राज्यात संतापाची लाट, अखेर शिंदेसेनेचे संजय गायकवाड नरमले, शहाणपण सुचले

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्यात म राठीच्या मुद्द्यावरून राजकारण तापत असताना शिंदे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी एकपेक्षा अधिक भाषा शिकायला छत्रपती संभाजीराजे काय मूर्ख होते काय? असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. बहुभाषेचे महत्त्व सांगताना त्यांनी महापुरुषांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याने राज्यभरात संतापाची लाट होती. आमदार गायकवाड यांनी तत्काळ माफी मागावी, अशी मागणी मराठीजनांनी केली. अखेर आमदार गायकवाड यांना शहाणपण सुचले आहे.

संजय गायकवाड यांनी बहुभाषेचे महत्त्व सांगत छत्रपती संभाजी म हाराज, शिवाजी महाराज, ताराराणी, येसूबाई आणि माँसाहेब जिजाऊ यांना अनेक भाषा येत होत्या. त्यामुळे ते लोक मूर्ख होते का? असे म्हणत महापुरुषांचा अपमान केला होता. त्यानंतर विरोधकांनी मोठ्या प्रमाणावर गायकवाड यांना झोडपून काढले. अखेर प्रकरण अंगाशी आले आहे, हे लक्षात येताच संजय गायकवाड यांनी याप्रकरणी माफी मागितली आहे.

माझ्या विधानाचा गैर अर्थ काढला गेला आहे. ज्या शिवभक्तांच्या भावना दुखावल्या असतील त्यांची दिलगिरी व्यक्त करत असल्याचे संजय गायकवाड म्हणाले. मी माझे विधान मागे घेतो. माझ्या बोलण्याचा विपर्यास करण्यात आला, अशी कोलांटउडी संजय गायकवाड यांनी मारली.

मराठी भाषेच्या मुद्द्यावर बोलताना ठाकरे बंधूंवर टीका करताना त्यांनी छत्रपती संभाजीराजे आणि शिवरायांबद्दलही अपशब्द वापरले. छत्रपती संभाजीराजे यांनी १६ भाषा शिकल्या, ते मुर्ख होते का? असा प्रश्न संजय गायकवाड यांनी विचारला. राज्यात फक्त हिंदीचा विषय नाही. जगात आज टिकायचे असेल तर तुम्हाला अनेक भाषा अवगत झाल्या पाहिजेत. हिंदीला विरोध करण्याचे कारण काय असे विचारीत जर ठाकरे ब्रँडचा करिश्मा असता तर बाळासाहेब हयात असतानाच २८८ आमदार निवडून यायला हवे होते. ते का आले नाहीत? असेही संजय गायकवाड म्हणाले.

# बच्चू कडूंच्या '७१२ कोरा कोरा यात्रे'ला सुरुवात; भर पावसात शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने हजेरी

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली '७१२ कोरा कोरा' यात्रेला आजपासून सुरुवात झाली. उंबर्डा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे करत चिलगव्हाण या स्व. साहेबराव करपे यांच्या गावामध्ये या यात्रेची सांगता होणार आहे. पहिल्या शेतकरी आत्महत्येची नोंद या गावी झाली होती. सुमारे १३८ किमीच्या या यात्रेला शेतकरी, विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी भर पावसात मोठ्या संख्येने उपस्थिती लावली आहे. सरकारने सातबारा कोरा केलाच पाहिजे अशी मागणी करीत शेतकरी मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी होत आहेत.

आज सकाळपासून पापळ येथून सुरु झालेल्या '७१२ कोरा कोरा' यात्रेत



शेतकरी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे या यात्रेची जाहीर सांगता सभा होणार आहे. ८ दिवसांच्या कालावधीत एकूण १३८ किमी पदयात्रा चालणार आहे. बच्चू कडू '७१२ कोरा कोरा' यात्रेच्या माध्यमातून गावागावात शेतकऱ्यांना, कष्टकरी समाजाला भेटून त्यांच्या समस्या समजून घेणार आहेत.

लाडकी बहिणीची योजनवेळी समिती केली काय?

या यात्रेत सहभागी झालेल्या आंदोलक शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्यावेळी लाडकी बहीण योजना आणली त्यावेळी कोणती समिती गठीत केली काय? तर नाही मग शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी समिती कशाला तयार करत आहेत थेट घोषणाच केली पाहिजे, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.

बच्चू कडू यांनी ज्यावेळी अन्नत्याग आंदोलन केले. त्यावेळी या सरकारने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत आश्वासन दिले होते. मात्र, त्यांनी ते पूर्ण केलेले नाही. काल आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री फडणवीस पंढरपूरला विठूरायाच्या शासकीय पूजेला गेले होते. त्यावेळी लाखो शेतकरी, भाविक उपस्थित होते. त्यांच्या समोर देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी, सातबारा कोरा करण्याची घोषणा करायला हवी होती, मात्र, ती त्यांनी केली नसल्याने सरकारची आश्वासने फसवी आहेत, अशी टीका आंदोलक शेतकऱ्यांनी केली. सर्व जाती धर्मातील लोकांनी एक व्हा, मत कोणालाही द्या, पण कर्जमाफीसाठी एक व्हा, असे आवाहन बच्चू कडू यांनी केले आहे.

# गडकरी म्हणाले, देशात गरिबांची संख्या वाढत आहे, काही श्रीमंत लोकांच्या हातामध्येच संपत्ती एकवटली

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात देशातील वाढती गरिबी आणि काही श्रीमंत लोकांच्या हातात ती एकाग्र झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. ग्रामीण भागाच्या कल्याणासोबतच आर्थिक विकास करता यावा यासाठी संपत्तीचे विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे ते म्हणाले. नागपूरमधील एका कार्यक्रमात बोलताना नितीन गडकरी यांनी शेती, उत्पादन, कर आकारणी आणि पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारी अशा विविध मुद्द्यांवर भाष्य केले. गडकरी म्हणाले, 'हळूहळू गरीब लोकांची संख्या वाढत आहे आणि काही श्रीमंत लोकांच्या हातात संपत्ती एकवटत आहे. असे होऊ नये. अर्थव्यवस्था अशा प्रकारे वाढली पाहिजे की ज्यामुळे रोजगार निर्माण होतील आणि ग्रामीण भागाला चालना मिळेल.'



दरम्यान, नितीन गडकरींच्या वक्तव्याचा दाखला देत काँग्रेसने हल्लाबोल केला आहे. मोदींच्या खोटारडेपणाचा नितीन गडकरी यांनी फॅक्ट चेक केल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. मोदी एका रॅलीत बोलताना देशात आपल्या सरकारच्या प्रयत्नामुळे गरीबी कमी होत असल्याचा दावा करत आहेत. याच वक्तव्याला गडकरी यांनी केलेल्या विधानाला जोडत काँग्रेसने मोदी सरकारमधील मंत्री सरकारची पोलखोल करत असल्याचे म्हटले आहे. दोन्ही नेत्यांच्या भाषणाची क्लिप ट्विटमध्ये पोस्ट केली आहे.

दरम्यान, गडकरी म्हणाले की, अर्थव्यवस्था अशा प्रकारे वाढली पाहिजे की ज्यामुळे रोजगार निर्माण होतील आणि ग्रामीण भागाला चालना मिळेल. ते म्हणाले, 'आम्ही अशा आर्थिक मॉडेलचा विचार करत आहोत जे रोजगार निर्माण करेल आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना देईल. संपत्तीचे विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे आणि या दिशेने अनेक बदल करण्यात आले आहेत.' गडकरी यांनी माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव आणि मनमोहन सिंग यांच्या उदारमतवादी आर्थिक धोरणांचे कौतुक केले, परंतु अनियंत्रित केंद्रीकरणाविरुद्ध इशारा दिला. ते म्हणाले, 'आपल्याला याची काळजी घ्यावी लागेल.'

CMYK

## अभिनेते म्हणतात गुटखा खा तर क्रिकेटर म्हणतात जुगार खेळ..!

आपल्या देशात जर सर्वाधिक ( चाहते ) फॅन फॉलोअर्स कोणाचे असतील तर ते चित्रपटात काम करणारे अभिनेते आणि क्रिकेट खेळणाऱ्या क्रिकेट खेळाडूंचे. कारण चित्रपट आणि क्रिकेट हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सिनेमा आणि क्रिकेट शिवाय भारतीयांचे जीवन अपूर्ण आहे. एकप्रकारे सिनेमा आणि क्रिकेट हे भारतीयांचे श्वास आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. क्रिकेट तर आपल्याकडे धर्म मानला जातो आणि काही प्रेक्षक चित्रपट अभिनेत्यांना देव मानून त्यांची पूजा करतात. दक्षिणेत तर अनेक अभिनेत्यांची मंदिरे देखील उभारुन त्यांची पूजा केली जाते. भारतीयांच्या दृष्टीने चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर म्हणजे सर्वस्व म्हणूनच त्यांचे लाखो चाहते आपल्या देशात आढळतात. विशेषतः तरुण वर्ग तर चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांना आपला आयडॉल मानतात. त्यांच्या प्रमाणे दिसायचा, वागायचा, वेशभूषा, केशभूषा करण्याचा प्रयत्न करतात. हे सिलिब्रेटी सांगतील त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करत असतो त्यामुळे चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांची जबाबदारी आणखी वाढते. जर तरुण वर्ग आपले अनुकरण करत असतील तर आपली वर्तणूक आदर्शवत असली पाहिजे. आपल्या वर्तणुकीतून किंवा आपण करत जाहिरातीतून तरुणांना चांगला संदेश गेला पाहिजे याची दक्षता या सिलिब्रेटींने घ्यायला हवी मात्र अलीकडे पैशासाठी चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर आपली ही जबाबदारी विसरत चालले आहेत. जो तरुण वर्ग आपल्याला फॉलो करतो, आपल्याला आदर्श मानतो त्यांना आपण पैशासाठी काय करायला लावत आहोत याचेही भान या सिलिब्रेटींना राहिले नाही. आता हेच पहा ना ज्या चित्रपट अभिनेत्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करतो तेच चित्रपट अभिनेते गुटख्याची जाहिरात करून तरुण मुलांना गुटखा खाण्यास सांगत आहेत. शाहरुख खान, अजय देवगण, अक्षय कुमार यासारखे हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार गुटख्याची जाहिरात करतात आणि तरुणांना गुटखा खाण्यास सांगतात. अभिनेते पैशासाठी चुकीची जाहिरात तरुण वर्गाला व्यसनाकडे वळवत आहेत तसेच क्रिकेटरही करत आहेत. वास्तविक क्रिकेटर हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. परदेशात गेल्यावर त्यांना आपल्या देशाचे राजदूत म्हणून ओळखले जाते. तरुण वर्गही क्रिकेट खेळाडूंचे अनुकरण करत असतात. तेच देशाचे राजदूत असलेले क्रिकेट खेळाडू पैशासाठी ऑनलाइन जुगाराची जाहिरात करत आहेत. ऑनलाइन जुगारामुळे तरुण वर्ग जुगारी तर गुटख्यामुळे व्यसनी होत आहे. आजचा तरुण हा उद्याचा नागरिक आहे. देशाचे भवितव्य तरुणांवर अवलंबून आहे हे माहीत असूनही अशाप्रकारची जाहिरात करून तरुण वर्गाला व्यसनी आणि जुगारी बनवण्याचे काम हे सिलिब्रेटी करत आहेत हा एकप्रकारचा देशद्रोहच आहे. चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर पैशासाठी अशाप्रकारचा देशद्रोह करून तरुणांचे आयुष्य उध्वस्त करत असतील तर त्यांना आदर्श का म्हणावे. अजूनही वेळ गेलेली नाही चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांनी गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगाराची जाहिरात करणे थांबवावी. पैशासाठी आपण तरुण पिढीसमोर कोणता आदर्श ठेवत आहोत याचा विचार या सिलिब्रेटींनी करावा. तुम्ही देशातील सन्माननीय नागरिक आहात. देशातील लाखो नव्हे तर करोडो नागरिक तुम्हाला आपला आदर्श मानतात त्याला तडा जाईल असे वागू नका. देशासाठी आणि देशातील तरुणांप्रति तुमचीही काही जबाबदारी आहे याचे भान ठेवून गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगारच्या जाहिराती बंद करा आणि तरुणांपुढे आदर्श निर्माण करा.

# श्रद्धेय भानुभाऊ शिंदे यांच्या जयंतीनिमित्त शेकडो रक्तदात्यांनी केले रक्तदान

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**

**दिग्रस :** रक्ताचा आहे थेंब थेंब हामौल्यवान याची असावी सर्वांना जान म्हणूनचं करावे रक्तदान. श्रद्धेय भानुभाऊ शिंदे यांच्या ६१ व्या जयंतीनिमित्त, एकनिल ब्लड बँक कानोबा कंट्रक्शन कंपनी च्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये अनेक मान्यवर आपली उपस्थिती दर्शविली. अनेक महिला व पुरुष रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून आपले सहभाग नोंदवले. रक्तदान शिबिर मध्ये रक्तदानाचे महत्व माजी सरपंच यादवराव गावंडे यांनी सांगितले. तसेच या रक्तदान शिबिराचे आयोजन कानोबा कंट्रक्शन कंपनी तथा राहुल भाऊ शिंदे यांनी केले होते. या कार्यक्रमात प्रत्येक रक्तदात्यांना अल्प उपहार तथा एनर्जी ड्रिंक व तसेच भेटवस्तू तथा प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. भानू भाऊ शिंदे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येते त्याचाच भाग म्हणून आज रक्तदान शिबिराचे आयोजन मोठ्या थाटात आयोजित केले आहे. या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सध्या भानुभाव शिंदे यांचे व्यक्तिमत्व सर्वांना सुपरचित असून अतिशय दानशूर व्यक्तिमत्व त्यांच्या पाऊलवर पाऊल ठेवत त्यांचाच वारसा जपत राहुल भाऊ शिंदे सामाजिक उपक्रम राबवण्याच्या उद्देशाने विविध माध्यमातून समाजसेवा उद्देशाने रक्तदानासारखा उपक्रम चालू केला आहे त्याचा अनुषंगाने. या सामाजिक उपक्रमाचा सर्वत्र कौतुक केला जात आहे.



## नोकरीचे आमिष दाखवून दोन मुलींवर लैंगिक अत्याचार; अंधेरीमधील व्यावसायिकाला अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** नोकरी मागण्यासाठी आलेल्या दोन अल्पवयीन मुलींच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या एका ६२ वर्षीय व्यावसायिकाला साकिनाका पोलिसांनी अटक केली. आरोपीने या मुलीची अील छायाचित्रे व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांना मारहाणही केली होती.

आरोपी प्रफुल्ल लोढा (६२) याचा व्यवसाय आहे. त्याच्याकडे १६ वर्षीय पीडित मुलगी नोकरी मागण्यासाठी गेले होती. चकाला येथील लोढा हाऊस येथे ४ जुलै रोजी आरोपीने मुलीला नोकरीचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. पीडित मुलीच्या १६ वर्षीय मैत्रिणीवरही त्याने अशा प्रकारे लैंगिक अत्याचार केला होता. नोकरी न देता दोन्ही मुलींची अील छायाचित्रे प्रसारित (व्हायरल) करण्याची धमकी दिली. याबाबत दोन्ही मुली जाब विचारण्यासाठी गेल्या असता आरोपी लोढाने दोन्ही मुलीना मारहण केली. तसेच पीडित मुलीच्या मैत्रिणीला लोढा हाऊसमध्ये डांबून ठेवले होते.

याप्रकरणी साकिनाका पोलिसांनी आरोपी प्रफुल्ल लोढा याच्या विरोधात भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३५२ (२), तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्यातील (पोक्सो) कलम ४, ८ अनव्ये गुन्हा दाखल केला. साकिनाका पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने आरोपी लोढाला अटक केली.

## शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळायला हवा : आ. अमित देशमुख

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्राने आणि राज्य शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे राज्यातील शेतकरी देशोधडीला लागला आहे, शेतीपूरक उद्योगी अडचणीत आले आहेत, बैल नाहीत म्हणूनऔतला जुंपून घेणाऱ्या हाडोळती येथील श्री अंबादास पवार या शेतकऱ्याची काल भेट घेतल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या ज्या व्यथा सांगितल्या त्या मन सुन्न करणाऱ्या आहेत, त्यामुळे केंद्राशी चर्चा करून आपणाला ज्याच्या कृषी धोरणात अमुलाग्र बदल करावे लागणार आहेत, राज्यातील शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या घटकांना उर्जित अवस्थेत आणावे, लातूर मधील दाळ उद्योगासारखे कृषी मालावर प्रक्रिया करणारे महाराष्ट्रातील उद्योग चांगले चालावेत म्हणून विशेष प्रयत्न करावेत अशी मागणी आज महाराष्ट्र विधानसभेत पुरवणी मागण्यावरील चर्चेदरम्यान बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केल्या आहेत.

महाराष्ट्राचा देशातील क्रमांक एक टिकून ठेवण्यासाठी, उद्योग वाढीला चालना आणि उद्योजकांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था टिकून ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्षम करावी, महाराष्ट्राची मातृभाषा मराठीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी उपाययोजना कराव्यात प्रत्येक जिल्ह्यात मराठी भवन उभारावे, विजेचे दर कमी करावेत, शेतीमालाला योग्य भाव मिळवून द्यावा, आदी मागण्या त्यांनी यावेळी कल्या. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळायलाच हवा

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख सोमवार दि. ७ जुलै रोजी विधानसभा सभागृहात पुरवणी मागण्यावरील चर्चेत सहभागी होताना म्हणाले की, केंद्र सरकारच्या आयात निर्यात धोरणामुळे राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या मालाला भाव मिळत नाही परिणामी शेतकरी देशोधडीला लागत आहे, सोयाबीन तूर उत्पादन करणारे शेतकरी अडचणीत सापडले आहेत, निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देणारे सत्ताधारी पक्षाचे नेते या विषयावर आता काहीच बोलत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे यात सुधारणा व्हायला हवी.

राज्यात कोणाकडून ही मागणी नसताना आणि पर्यायी मार्ग उपलब्ध असताना शासन शक्तीपीठ महामार्गाचा घाट का घालत आहे हे समजत नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने अधिग्रहण करण्याचे प्रयत्न होत आहेत त्यामुळे हा शक्तिपीठ नसून सत्तीपीठ महामार्ग असल्याची चर्चा राज्यात सुरू आहे शासनाने हा प्रकार ताबडतोब थांबवणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील विजेचे दर देशातील इतर राज्याच्या तुलनेत जास्तीचे आहेत खाजगीकरणामुळे हे दर वाढत असल्याचे दिसून येते आहे. राज्यातील सामान्य जनतेबरोबर उद्योजक शेतकरी हे सर्वच घटक विजदर वाढीमुळे अडचणीत येत आहेत. जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचा घाट घातला जात आहे, वाढीव वीज बिलातून राज्यातील जनतेची सुटका करणे आवश्यक आहे.

# डिलिव्हरी बॉक्सवरील लेबलद्वारे होतेय ग्राहकांची फसवणूक: फेडएक्स

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सगळ्याच सायबर घोटाळ्यांमध्ये हॅकिंग सामील नसते. काही घोटाळे आपल्या दैनंदिन सवयींमुळे होतात. शिपिंग लेबल न काढता एखादा डिलिव्हरी बॉक्स फेकून देण्यात काय नुकसान असणार आहे, असे आपल्याला वाटू शकते, पण तसे केल्याने तुमचे नाव, फोन नंबर आणि पत्ता यांसारखे वैयक्तिक तपशील उघड होत असल्याचे जगातील सर्वात मोठ्या एक्सप्रेस वाहतूक कंपनी फेडएक्सने ग्राहकांच्या निदर्शनास आणले आहे. घोटाळेबाज या तपशीलांचा उपयोग करून स्वतः वैध असल्याची बतावणी करून तुमच्याकडून आणखी संवेदनशील डेटा काढून घेऊ शकतात. अशा धोक्यांपासून सावध राहणे ही सुरक्षित राहण्याची पहिली पायरी असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

**डिलिव्हरी बॉक्स घोटाळा म्हणजे काय?**

प्रत्येक डिलिव्हरी बॉक्सवर काही महत्त्वाची वैयक्तिक माहिती असते जशी की, तुमचे नाव, पत्ता आणि फोन नंबर. सायबर गुन्हेगार बऱ्याचदा असे फेकून दिलेले बॉक्स कचऱ्याच्या डब्यातून गोळा करतात आणि त्याच्यावर असलेल्या माहितीचा उपयोग कुरियर एजंट किंवा ग्राहक सेवा प्रतिनिधी म्हणून बतावणी करण्यासाठी करतात. त्यांच्याकडे पुरेसा डेटा गोळा झाल्यानंतर त्यांचे संभाषण खरे वाटते आणि मग घोटाळा होतो.

ते तुम्हाला कसे फसवतात

तुमची माहिती मिळवल्यावर, घोटाळेबाज:

तुम्हाला दूषित लिंक किंवा क्यूआर (ठ) कोडसह खोटा डिलिव्हरी किंवा रिफंड मेसेज पाठवू शकतात

कुरियर एजंट म्हणून तुम्हाला कॉल करू शकतात आणि तुमच्याकडून ओटीपी किंवा काही वैयक्तिक माहिती मागू शकतात

तुम्हाला बनावट पडताळणी पत्रके भरण्यास सांगू शकतात.

संशयास्पद लिंकवर क्लिक केल्यामुळे किंवा अज्ञात क्यूआर कोड स्कॅन केल्यामुळे मालवेअर हल्ले किंवा आर्थिक घोटाळा होऊ शकतो. एका साध्या बॉक्स लेबलपासून सुरू झालेला हा प्रकार मोठ्या ओळख–चोरीच्या मामल्यापर्यंत पोहोचू शकतो.

सुरक्षित राहण्याचा सोपा उपाय: थांबा, विचार करा आणि कृती करा

बॉक्स फेकण्यापूर्वी त्यावरील शिपिंग लेबल काढून टाका किंवा स्क्रॅच करा

तुमचे नाव, फोन नंबर आणि पत्ता यावर एखाद्या मार्करने काळे करा

लेबल्स फेकून देण्याअगोदर लेबल्स फाडून त्याचे छोटे छोटे तुकडे करा

अवांछित संभाषणापासून (कम्युनिकेशन) नेहमी सावध रहा

अधिकृत ग्राहक सेवा चॅनलच्या मदतीने संशयास्पद मेसेज किंवा कॉल तपासून बघा

स्रोताची तपासणी / खात्री केल्याशिवाय कधीही पैसे ट्रान्सफर करू नका किंवा ओटीपी सहित कोणतीही वैयक्तिक माहिती शेअर करू नका.

या डिजिटल युगात, भौतिक कचरा देखील सायबर गुन्ह्यासाठी मदतरूप ठरू शकतो. सावध राहून आणि वैयक्तिक डेटा आपण कसे हातळतो याबाबतीत छोटे छोटे सजग बदल करून तुम्ही स्वतःचे आणि तुमच्या प्रियजनांचे रक्षण करू शकता. जर तुम्ही एखाद्या गुन्ह्याला बळी पडला असाल किंवा सायबर घोटाळ्याची शंका तुम्हाला असेल, तर आपल्या स्थानिक कायदा अंमलबजावणीशी संपर्क साधा किंवा १९३० वर सायबर क्राइम हेल्पलाइन मार्फत किंवा सायबरक्राईम. जीओव्ही.इनवर तत्काळ त्याची तक्रार करा.

सायबर जागरूकता आणि शिक्षणाच्या मदतीने अधिक सुरक्षित, लवचिक समुदायाची उभारणी करण्याबाबत फेडएक्स वचनबद्ध आहे, ज्यातून एक जागतिक लॉजिस्टिक्स अग्रणी या नात्याने आमच्या ग्राहकांचे, टीम सदस्यांचे आणि समुदायांचे रक्षण करण्याबाबतची आमची जबाबदारी प्रतिबिंबित होते.

# आषाढी एकादशी निमित्त राज्यपालांची श्री शृंगेरी शंकर मठाला भेट

## पंढरपूरची वारी जगातील अद्भुत परंपरा असल्याचे राज्यपालांचे प्रतिपादन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी आषाढी एकादशी निमित्त चेंबूर येथील श्री शृंगेरी शंकर मठ शारदा मंदिराला भेट देऊन मंदिरातर्फे रविवारी (दि. ६ जुलै) आयोजित आषाढी एकादशी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी उपस्थित भाविकांशी संवाद साधताना राज्यपालांनी महाराष्ट्राच्या अध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरांचा गौरव केला. अनेक शतकांपासून अव्याहत सुरु असलेली पंढरपूरची वारी ही जगातील अद्भुत लोकपरंपरा असून श्रद्धा, भक्ति व समतेची ही वारी गरीब – श्रीमंत व तरुण – वृद्ध असे सर्व भेद मिटवणारी असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी यावेळी केले.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी असून या भूमीने जगाला संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, समर्थ रामदास असे अनेक संतश्रेष्ठ दिले आहे. संत नामदेवांनी भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत पोहोचवली आहे. महाराष्ट्र भूमीने देशाला छत्रपती शिवाजी महाराजांसारखे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक दिले असून महाराजांनी स्वधर्माचे रक्षण करताना इतर धर्मांचा यथायोग्य आदर केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज सच्चे धर्मनिरपेक्ष शासक होते. भारतीय लोक देखील स्वभावत:च धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करणारे आहेत असे राज्यपालांनी सांगितले.

मंदिरातर्फे चालविल्या जाणाऱ्या मानवतावादी कार्याबद्दल विश्वस्तांचे अभिनंदन करून सुवर्ण भारती आरोग्य केंद्राच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टर्स व आरोग्य सेवकांना राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी कौतुकाची थाप दिली. यावेळी राज्यपालांच्या उपस्थितीत अन्नछत्र चालविण्यात योगदान देणाऱ्या महिला स्वयंसेविकांचा सत्कार करण्यात आला.




श्री शृंगेरी शंकर मठ शारदा मंदिराचे मानद व्यवस्थापक डॉ. जी. मुथुकृष्णन यांनी आपल्या प्रास्ताविकात मंदिरातर्फे चालविल्या जाणाऱ्या धार्मिक अनुष्ठानाची तसेच सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. श्री शृंगेरी शंकर शारदा पिठाचे जगद्गुरू शंकराचार्य श्री भारती तीर्थ यांच्या सन्यास दीक्षेचे यंदा पन्नासावे वर्ष असून त्यांच्या प्रेरणेने मंदिरातर्फे धार्मिक अनुष्ठानाशिवाय अन्नदान व वैद्यकीय सेवा देण्याचे कार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. मंदिरातर्फे गरजू रुग्णांसाठी वैद्यकीय सेवेकचे मोठे कार्य केले जात असून आतापर्यंत १ लाख लोकांनी त्याचा लाभ घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री शृंगेरी शंकर मठ शारदा मंदिरातर्फे ३०० महिलांना शिलाई यंत्र देण्यात आले असून मानसिक दृष्ट्या दिव्यांग मुलांसाठी कार्य करणाऱ्या नाशिक, बदलापूर व सातारा येथील संस्थेला मदत केली जात असल्याचे मंदिराच्या सुवर्ण भारती आरोग्य केंद्राचे विश्वस्त डॉ. कुमारस्वामी यांनी सांगितले.

सुरुवातीला राज्यपालांनी श्री शृंगेरी शंकर मठ येथील देवी शारदा, श्री गणेश व शंकराचार्य यांच्या प्रतिमांचे दर्शन घेतले. कार्यक्रमाला मंदिराचे विश्वस्त मोहन सुब्रमण्यम, जुना हनुमान मंदिर ट्रस्टचे विश्वस्त सुबोध आचार्य, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उपसचिव एस राममूर्ती आदी उपस्थित होते.

यावेळी आषाढी एकादशीनिमित्त गायिका पूजा गोपालन व त्यांच्या संगीत कला चमूने यांनी मराठी, हिंदी व तामिळ अभंग व भक्तिगीतांचा कार्यक्रम सादर केला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मेहकर तालुक्यातील ९८ ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण; ८ जुलैला सोडत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** ग्रामविकास विभागाच्या अधिसूचनेनुसार, मेहकर तालुक्यातील एकूण ९८ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या व मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियमामधील तरतुदींनुसार हा कार्यक्रम पार पाडण्यात येणार आहे.

आरक्षण सोडत सन २०२५ ते २०३० या कालावधीत सार्वत्रिक निवडणुकांद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नारिकांचा मागास प्रवर्ग तसेच खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण सोडत दि ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, मेहकर येथे निश्चित होणार आहे. सदर आरक्षण सोडतीकरीता मेहकर तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मेहकर तहसीलदार निलेश मडके यांनी केले आहे.

### देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागताला काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांची हजेरी; सोलापूरच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतला हजेरी लावली आहे. त्यांच्या या उपस्थितीमुळे सोलापूरच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. दिलीप मानेंनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह माजी आमदार दिलीप माने हे देखील मुखमंत्र्यांच्या भेटीला उपस्थित होते.

अलीकडेच झालेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली माजी आमदार दिलीप मानेंनी निवडणूक लढवत विजय मिळवला होता. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काल आषाढी एकादशी निमित्ताने कार्यक्रम आटपून परत निघताना सोलापूर विमानतळवर दिलीप माने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मात्र या भेटीमुळे राजकिय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

नुकतंच सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट बघायला मिळाला होता. बाजार समितीच्या निवडणुकीसाठी भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-काँग्रेस नेत्यांचे एकत्रित पॅनल करण्यात आला होता. काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने, काँग्रेस कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, काँग्रेस नेते बाळासाहेब शेळके यांचा भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला पाठिंबा असल्याचं जाहीर करण्यात आलं होतं.

### मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणींच आजपासून लाईव्ह प्रक्षेपण सुरु



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शाहाण्याने कोर्टाची पायरी कधीही चढू नये, असे म्हणतात. पण नाइलाजाने अनेकांना ती चढावी लागते. कोर्ट कचेरी म्हटले ही वारंवार कोर्टाच्या फेऱ्या माराव्या लागणार ही प्रत्येकाची भावना असते. परंतु आता पक्षकारांना वारंवार कोर्टाचे हेलपाटे मारावे लागणार नाहीत. मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणीचं थेट प्रक्षेपण लोकांना त्यांच्या आता घरी बसून पाहता येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी या प्रक्रियेला हिरवा कंदील दाखवल्यानंतर आजपासून न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रक्षेपण सुरू झालंय. त्यामुळे आपल्या प्रकरणात नेमकं काय होतंय?, हे पाहण्यासाठी न्यायालयात लोकांना माराव्या लागणाऱ्या फेऱ्यांपासून आता काहींची सुटका होणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या कामकाजाचं थेट प्रक्षेपण प्रसारीत करण्यासाठी जनहित याचिका दाखल केल्याच वकील मॅथ्यूज नेदुमपारा यांनी काही दिवसांपूर्वीच न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल होत. त्यावर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठान लवकरत सुनावणीच्या थेट प्रक्षेपणासाठी तांत्रिक व्यवस्था केली जात असल्याचं स्पष्ट केल होत. सुरुवातीला पाच प्रमुख खंडपीठापुढील सुनावणींचे थेट प्रक्षेपण केल जाईल, असंही यावेळी हायकोर्टानं स्पष्ट केल. त्यानुसार सोमवार, ७ जुलैपासून चार प्रमुख कोर्टाचं लाईव्ह स्ट्रिमिंग सुरू करण्यात आलं आहे.


# बस-कारच्या भीषण अपघातात चार ठार

## महालक्ष्मीचे दर्शन घेऊन परतताना भाविकांवर काळाचा घाला

दैनिक आपला विदर्भ

**अथणी/प्रतिनिधी :** कोल्हापूरहून देवदर्शन घेऊन जात असलेल्या भाविकांच्या कार व कर्नाटक परिवहनच्या बसच्या झालेल्या भीषण अपघातात चार भाविक जागीच ठार झाले.तर एक जण जखमी झाला. सदर अपघात अथणीजवळ विजापूर राज्य मार्गावर ६ जुलै रोजी दुपारी बारा वाजताच्या सुमारास घडला.राहुल अशोक मॅळशी (वय २५), राधिका राहुल मॅळशी (वय २२), गिरीष अशोक बिळ्ळुरगी (वय २८), संगमेश गिरीष अवरगोंड (वय २६) (सर्व जण रा. अफझलपूर, जि. गुलबर्गा) अशी ठार झालेल्यांची नावे आहेत; तर विनायक प्रसाद तिवारी (वय ३०, रा. गुलबर्गा) हा जखमीझाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

प्राप्त माहितीनुसार राहुल मॅळशी आपल्या पत्नी व नातेवाइकांसह कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवीच्या दर्शनासाठी गेले होते. रविवारी तेथून परत गावाकडे जात असताना अथणी शहरापासून एक किलो मीटर अंतरावरील विजापूर मार्गावर कर्नाटक परिवहनच्या विजापूर-मिरज या बसला त्यांच्या कारची धडक झाली.या भीषण अपघातात बसमधील कोणाला फारशी दुखापत झाली नाही.मात्र, भीषण धडकेत कारमधील राहुल, गिरीष व संगमेश यांचा जागीच मृत्यू झाला. जखमी राधिका व विनायक यांना नागरिकांनी बाहेर काढून उपचारासाठी अथणी सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना राधिका हिचा मृत्यू झाला.तर, विनायक यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांच्या डोक्याला मार लागला आहे. दोन्ही वाहनांचे झालेले नुकसान पाहून व कारमध्ये अडकलेले मृतदेह पाहून राज्य मार्गावरील प्रवासी हळहळले. बसच्या चालकाच्या बाजूचे मोठे नुकसान झाले आहे; तर मोटारीचा पूर्ण चक्काचूर झाला आहे. घटनेची माहिती मिळताच अथणी पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक मल्लिकार्जुन उप्पार यांनी सहकाऱ्यांसह भेट दिली. या घटनेची नोंद अथणी शहर पोलिस ठाण्यात झाली असून, पोलिस तपास करत आहेत.राहुल व राधिका हे आपल्या दोघा नातेवाइकांना व विनायक या मित्राला घेऊन कोल्हापूरला गेले होते. संगमेश व गिरीष हे नातेवाईक आहेत. तर विनायक हा राहुल याचे मित्र असून, ते एसडीआरएफमध्ये सेवा बजावत आहेत. पाच जणांनी प्रवास करताना त्यातील केवळ विनायक हे बचावले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.







### मृतदेह काढण्यासाठी मोठी कसरत

अथणी शहरापासून काही अंतरावर मोठा अपघात झाल्याने अनेक वाहनधारक थांबून चौकशी करत होते. त्यामुळे गर्दी झाल्याने विजापूर-अथणी मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. काही जणांनी जखमींना मदत करून उपचारासाठी पाठविले. प्रारंभी मृत व जखमींना मोटारीतून बाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. चालक व समोरील आसनावर बसलेले दोन्ही मृतदेह काढण्यासाठी अधिक प्रयत्न करावा लागला.

# रायगड किनाऱ्यावर आली संशयास्पद बोट, सुरक्षा वाढवली

**रायगड/प्रतिनिधी :** रायगडच्या समुद्र किनाऱ्यावर एक संशयास्पद बोट दिसल्यामुळे, परिसरात खळबळ निर्माण झाली आहे. या बोटीचा अलर्ट मि ळाल्यानंतर रायगड पोलिस, बॉम्ब डिस्पोजल स्क्वॉड, क्विक रिस्पॉन्स टीम, नौदल आणि तटरक्षक दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली.

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील रेवदंडा किनाऱ्याजवळ एक संशयास्पद बोट दिसल्याने किनारी भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पोलिसांनी रविवारी ही माहिती दिली. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, रेवदंडाच्या कोरलाई किनाऱ्यापासून सुमारे दोन नॉटिकल मैल अंतरावर सुरक्षा दलांना ही बोट दिसली. बोटीची माहिती मिळताच, रायगडच्या पोलिस अधीक्षक आंचल दलाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी किनाऱ्यावर पोहोचले. तथापि, मुसळधार पाऊस आणि वाऱ्याम ुळे त्यांना बोटीपर्यंत पोहोचण्यात मोठी अडचण आली. दलाल स्वत: एका बार्जमधून बोटीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होते, परंतु खराब हवामानामुळे त्यांना परतावे लागले. खबरदारी म्हणून, परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिस दल तैनात करण्यात आले आहे आणि जिल्ह्यात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

# सहकार सप्ताह उत्साहात साजरा; विविध उपक्रमांतून सहकार चळवळीला बळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ व भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला चार वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्ह्यात १ ते ६ जुलै दरम्यान सहकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. विविध उपक्रमाच्या माध्यमातून सहकार चळवळीला बळ देत सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

सप्ताहाचा शुभारंभ १ जुलै रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था, बुलडाणा यांच्या कार्यालय परिसरात वृक्षारोपणाने करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाच्या संदेशासोबत सहकार व शाश्वतता यांचा सुंदर संगम या उपक्रमातून दाखविण्यात आला. बधुवार दि.२ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., बुलडाणा यांच्यावतीने शेतकरी व कर्जदारांसाठी कर्ज वितरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना शेतीसाठी सुलभ दराने कर्जे वितरित करण्यात आले.

गुरुवार दि. ३ रोजी जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सचिव यांच्यासाठी केंद्रीय योजनांवर माहिती व चर्चासत्र घेण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय सहकार धोरण, बँकिंग, शेतकरी समृध्दी योजनेविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शुक्रवार दि. ४ जुलै रोजी शिवाजी महाविद्यालय, मोताळा येथे विद्यार्थ्यांसाठी सहकार क्षेत्रावर विशेष व्याख्यान घेण्यात आले. सहकार मूल्ये, स्वावलंबन आणि ग्रामीण विकासामधील सहकाराची भूमिका या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

शनिवार दि. ५ रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात स्वच्छता अभियान राबवून सहकार क्षेत्रामधील स्वच्छता आणि शिस्तीच्या मूल्यांना अधोरेखित करण्यात आले. सहकार सप्ताह २०२५ मधील हे विविध उपक्रम जिल्ह्यातील सहकारी चळवळीला अधिक बळकट करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सप्ताहाचा समारोप रविवार दि. ६ जुलै रोजी केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापना दिनानिमित्त विविध रंगांनी सजलेली रांगोळी स्पर्धा आयोजित करून करण्यात आला. या उपक्रमामध्ये सहकारी संस्थांचे कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# अंगणवाडी सेविका, मदतनीस, होमगार्ड यांच्या मानधनवाढीच्या निर्णयाबद्दल संजय रायमुलकर यांचे कडून शासनाचे आभार

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** अंगणवाडी सेविका, मदतनीस, होमगार्ड यांच्या मानधन वाढीची आम्ही दीर्घ काळापासून मागणी करीत होतो. कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत मानधन वाढीचा युती सरकारने निर्णय घेतला आहे. त्याबद्दल माजी आमदार संजय रायमुलकर यांनी शासनाचे आभार मानले आहेत.

संजय रायमुलकर यांच्यासह अनेकविध लोकप्रतिनिधींनी विधिमंडळात अंगणवाडी सेविका, मदतनीस ,होमगार्ड यांच्या मानधनात शासनाने वाढ करावे यासाठी आवाज उठविला होता. मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंगणवाडी सेविका व मदतनिसांच्या पूर्वीच्या मानधन प्रतिमाह ३००० रुपये वाढ आणि दोन हजार रुपये प्रोत्साहन भत्ता अशी भरघोस वाढ करण्यात आली आहे. यामुळे शासनाच्या तिजोरीवर ९०० कोटी रुपयांचा भार पडणार आहे. होमगार्ड कर्मचाऱ्यांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्यात आली आहे , अशी घोषणा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केली.



ग्रामीण भागातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत गाव पातळीवर राज्यात २६ हजार ग्राम रोजगार काम करतात. त्यांना आठ हजार रुपये प्रतिमाह मानधन व दोन टक्के प्रोत्साहन भत्ता अशी वाढ करण्यात आल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर काल केली. यामुळे शासनावर ३०० कोटी रुपयांचा आर्थिक भार वाढणार आहे. ग्रामीण भागात अशा प्रवर्तक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामरोजगार यांचे विविधांगी कार्य असून शासनाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे काम हे घटक करतात. त्यामुळे त्यांच्या मानधनात भरीव वाढ करावी, अशी मागणी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे संजय रायमुलकर यांच्यासह विविध आमदारांनी केली होती. शासनाच्या मानधन वाढीचा निर्णय याबद्दल त्यांनी महायुती शासनाचे मनस्वी आभार मानले आहेत.

### धुरंधरमध्ये रणवीर त्याच्यापेक्षा २० वर्षांनी लहान असलेल्या या अभिनेत्रीबरोबर करणार रोमान्स

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंगनं ४०व्या वाढदिवशी त्याच्या चाहत्यांना आगामी धुरंधरच्या फर्स्ट लूकची एक उत्तम भेट दिली. आदित्य धर दिग्दर्शित धुरंधरचा फर्स्ट लूक प्रेक्षकांना खूप पसंत पडला आहे. रणवीरशिवाय निर्मात्यांनी फर्स्ट लूकमध्ये चित्रपटातील इतर महत्त्वाच्या पात्रांची झलकही दाखवली आहे. संजय दत्त, आर माधवन, अक्षय खन्ना, अर्जुन रामपाल यांसारख्या दिग्गज स्टार देखील धुरंधर चित्रपटाचा एक भाग बनले आहेत. आता या चित्रपटातील एका गोष्टीमुळे लोकांना धक्का बसला आहे, अनेकजण सोशल मीडियावर रणवीरला ट्रोल करत आहेत. धुरंधर चित्रपटाच्या फर्स्ट लूकमध्ये रणवीरबरोबर सारा अर्जुन दिसली आहे. यामुळेच या यूजर्स त्याला ट्रोल करत आहेत. रणवीर सिंग यावर्षी ४० वर्षांचा झाला आहे, तर सारा फक्त २० वर्षांची आहे. वयातील इतक्या फरकामुळं यूजर्स संतापले आणि सोशल मीडियावर याबद्दल वाद सुरू झाला.

# महाविकास आघाडीची संवाद बैठक उत्साहात आगामी नगर परिषद निवडणूक संदर्भात चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** आगामी नगर परिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भात महाविकास आघाडी च्या वतीने येथील माहेश्वरी भवन मध्ये संवाद बैठकीचे आयोजन काल दि . सहा जुलै रोजी करण्यात आले होते या बैठकीचे अध्यक्ष म्हणून रिसोड मालेगाव विधानसभेचे आमदार तथा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमित झनक हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील,महाविकास आघाडीचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब देशमुख ,शिवसेना नेते तथा जिल्हा परिषद चे माजी सभापती विश्वनाथ सानप हे होते बैठकीमध्ये आगामी नगर परिषद च्या निवडणुकीच्या संदर्भात चर्चा करण्यात आली मागील पाच वर्षाच्या कालावधी नगरसेवकांच्या ठेकेदारीला जनता कंटाळली आहे जनतेच्या नाराजीचा फायदा या वेळी महाविकास आघाडीला होणार आहे याचा पुरेपूर फायदा घेण्यात येणार असून त्या अनुषंगाने रणनीती आखण्यात येणार आहे यावेळी परिवर्तन अटळ असल्याचा सूर मान्यवरांच्या मनोगतातून उमटला यावेळी उपस्थितांची मनोगतही घेण्यात आले नगर परिषद ची निवडणूक ही पूर्ण ताकदीने लढवून काबीज करून रिसोड शहराचा विकास करण्या संदर्भाने योग्य त्या उपाययोजना करण्याचे व जोमाने कामाला लागण्याचे निर्देश आमदार अमित झनक यांनी उपस्थित महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिले यावेळी उपस्थितांची मनोगतही घेण्यात आले. यावेळी डॉक्टर रमेश साबू,राजूसेठ तोष्णीवाल, शिवसेना शहराध्यक्ष संजय इरतकर शेख अजीज,घनश्याम मापारी तसवर कादरी, सिकंदर खान, कैलास ठाकरे, मा.गरसेवक फायाज अहेमद, इरफान कुरेशी, अकबर बागवान, भारत भाऊ शिंदे, शेख मन्नान, पप्पीभाई कदम, रियाज पठाण, राजूभाऊ राऊत, गणेश गांजरे तसेच महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी नगराध्यक्ष विजयकुमार तूरूकमाने यांनी केले.



## विविध वृत्त...

### जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या निवड चाचणी परीक्षेचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. संपूर्ण निवासी स्वरूपाचे शैक्षणिक सत्र २०२६–२७ करीता पात्र विद्यार्थ्यांनी २९ जुलैपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा, असे आवाहन श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य आर.आर.कसर यांनी केले आहे.

पात्रता : विद्यार्थी इयत्ता पाचवीमध्ये २०२५–२६ सत्रात बुलडाणा जिल्ह्यातील सरकारमान्य शाळेत शिकत असावा. विद्यार्थ्याचे पालक हे बुलडाणा जिल्ह्याचेच रहिवासी असावेत. जन्मतारीख १ मे २०१४ ते ३१ जुलै २०१६ (दोन्ही तारखा धरून) या दरम्यानची असावा, विद्यार्थ्यांने इयत्ता तिसरी, चौथी, पाचवी सलग सरकारमान्य शाळेतून शिकलेले व उत्तीर्ण असावा.

आवश्यक कागदपत्रे: विद्यार्थी व पालकांच्या स्वहस्ताक्षरीत सही व छायाचित्र जेपीजी फॉरमॅटमध्ये स्कॅन करून अपलोड करावे, अनुसूचित जाती , जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक. परीक्षेची तारीख शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ असून अर्ज www.navodaya.gov.in या संकेतस्थळावर नि:शुल्क भरु शकता. सर्व इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

### जिल्हा कारागृहात क्षयरोग दुरीकरण मोहिम; बंद्यांची तपासणी व जनजागृती कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा कारागृह, बुलढाणा आणि जिल्हा क्षयरोग कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील बंद्यांची तपासणी करून राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत बंद्यांमध्ये क्षयरोगासंदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कारागृहाचे अधीक्षक संदीप भुतेकर हे होते. जिल्हा क्षयरोग अधिकारी वर्षा गुट्टे यांनी बंद्यांना क्षयरोगासंबंधी मार्गदर्शन केले. शिबिरात बंद्यांची आधुनिक एक्स–रे मशिनद्वारे तपासणी करण्यात आली. तसेच क्षयरोगाच्या संशयित रुग्णांचे थुंकीचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवण्यात आले. या तपासणीतून कारागृहातील आरोग्यस्थितीवर लक्ष ठेवण्याबरोबरच क्षयरोगाचे लवकर निदान करून उपचार शक्य होणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, तुरुंगाधिकारी उमेश नाईक तसेच जिल्हा क्षयरोग कार्यालयातील डॉ. शिवदास सरोदे, सिध्देश्वर सोळंकी, राजेंद्र सुरडकर, मुकेश घेंगे, राजेंद्र सरोदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमाद्वारे जिल्ह्यातील राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण मोहिमेची प्रभावी सुरुवात करण्यात आली असून, बंद्यांच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टिकोनातून ही मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### सहकार पुरस्कार; सहकारी संस्थांकडून १८ जुलैपर्यंत प्रस्ताव आमंत्रीत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्यातील सहकार चळवळीला बळकटी देणाऱ्या व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना महाराष्ट्र शासनामार्फत ‘‘सहकार पुरस्कार‘‘ देऊन गौरविण्यात येणार आहे. आर्थिक वर्ष २०२३–२४ मधील कामगिरीच्या आधारे या पुरस्कारासाठी पात्र संस्थांची निवड केली जाणार आहे. याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम राज्य शासनाने नुकताच जाहीर केला आहे.

पुरस्कारासंदर्भातील सविस्तर माहिती सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://sahakarayukta.maharashtra.gov.in तसेच जिल्हा उपनिबंधक व तालुका स्तरावरील सर्व सहायक निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी केलेल्या इच्छुक सहकारी संस्थांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह १८ जुलै २०२५ पर्यंत संबंधित तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयात सादर करावेत. सहकारी क्षेत्रातील पारदर्शक व प्रेरणादायी कार्यास शासन पुरस्कृत स्वरूपात प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी केले आहे.

# बांधकाम पूर्ण झालेल्या ट्रामा केयर सेंटरसाठी पद निर्मिती मंजूर करण्याची माजी आमदार संजय रायमुलकर यांची आरोग्य मंत्र्यांकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या १० कोटी रूपयांच्या ट्रामा केयर सेंटरची इमारत बांधून पूर्ण झाली आहे.ही सेवा सुरू होण्यासाठी आकृतीबंधानुसार १५ पदांची पद निर्मिती मंजूर करण्यात यावी ,अशी मागणी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे संजय रायमुलकर यांनी केली आहे.





१० कोटी रुपये खर्चाच्या ट्रामा केयर सेंटरची सर्व सुविधांनी युक्त भव्य इमारत ग्रामीण रुग्णालय परिसरात बांधून वर्ष लोटले आहे. समृध्दी महामार्ग आणि राज्य महामार्ग यावरील जालना ते वाशिम अंतरात नेहमी अपघाताच्या घटना होतात . अतिगंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी संभाजी नगर अथवा इतर मोठ्या ठिकाणी न्यावे लागते. म्हणून मेहकर येथे ट्रामा केयर उभारण्यासाठी प्रतापराव जाधव व संजय रायमुलकर यांच्या मागणीनुसार तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० कोटी रुपये मंजूर केले होते.

ट्रामा केयर सेंटरची अद्ययावत इमारत पूर्ण होऊन एक वर्ष झाले आहे. सदर ठिकाणी उपचाराची व्यवस्था सुरू होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे मुंबई येथे आरोग्य मत्री प्रकाश आबीटकर यांची माजी आमदार संजय रायमुलकर यांनी भेट घेऊन ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. आकृतीबंधानुसार अस्थिव्यंग चिकित्सक , बधिरीकरण शास्त्रज्ञ २, दोन वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, अधिपरिचारिका २ ही नियमित पदे आणि अधिपरिचारीका, वाहन चालक, तीन कक्षसेवक ,दोन सफाईगार अशा प्रकारच्या १५ अधिकारी ,कर्मचाऱ्यांच्या पदनियुक्तीला मंजुरी देण्याबाबतचे पत्र रायमुलकर यांनी आरोग्यमंत्र्यांना दिले. यासंदर्भात पुढील कार्यवाही सत्वर करण्यात येत असल्याचे आबीटकर यांनी त्यांना सांगितले.

## जास्त बाजारभावाचे आमिष अन् शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडून २ कोटी २७ लाखांचा गंडा, नेमके काय आहे प्रकरण?

**नांदेड/प्रतिनिधी :** सोयाबीन, हरभरा आणि तुरीला बाजारपेठेत मिळणाऱ्या दरापेक्षा अधिक भाव देण्याचे आमिष दाखवून धर्माबादमधील पाच व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची सुमारे २ कोटी २७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. २०२२ पासून डिसेंबर २०२४ पर्यत या व्यापाऱ्यांनी जवळपास २ हजार ६६४ क्विंटल शेतीमाल खरेदी केला. मात्र पैसे देण्याऐवजी वेळकाढूपणा करत शेतकऱ्यांना तब्बल दोन वर्षे फसवत ठेवले. अखेर वैतागलेल्या शेतकऱ्यांनी पोलिस ठाण्याचा दरवाजा ठोठावला असून, या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

धर्माबाद तालुक्यातील समराळा येथील बालाजी लक्ष्मण देवकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी आपली तक्रार धर्माबाद पोलिस ठाण्यात नोंदवली. त्यांच्या म्हणण्यानुसार, शहरातील श्रीकृष्ण भुसार दुकानातील व्यापारी लक्ष्मण कोंडिबा देवकर, सायन्ना गंगाराम इप्तेकर, पोतन्ना सायन्ना इप्तेकर, बालाजी सायन्ना इप्तेकर आणि संजय गंगाधर देवकर यांनी आपल्या मालाला बाजारपेठेपेक्षा जास्त दर देण्याचे गोड आश्वासन दिले होते.

शेतकऱ्यांना थोडा जास्त नफा मिळेल, या आशेवर विश्वास ठेवून त्यांनी आपला मौल्यवान शेतीमाल या व्यापाऱ्यांकडे विक्रीसाठी दिला. या काळात व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, हरभरा आणि तूर खरेदी करून साठवला. काहींनी आपला सगळा कर्जाचा मालही या व्यापाऱ्यांकडे दिला होता.

## जुगार अड्ड्यावर छापा ४ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** दराटी पोलीस स्टेशन हद्दीतील ५२ पत्ते जुगार अड्ड्यावर छापा टाकून ९ इसमाविरुध्द कारवाई करून ४ लाख १७ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ६ जुलै रोजी केली.

सदर घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेला पेट्रोलिंग करीत असताना माहिती मिळाली की, खरबी गावच्या शेतशिवारात पत्र्याच्या शेडमध्ये काही लोक गोलरिंगन करुन पैसाच्या हारजितवर ५२ पत्ते जुगार खेळ खेळत असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन पंचा समक्ष अतिशय शिताफीने खरबी शेतशिवारात छापा टाकला असता सदर ठिकाणी नारायण बुमन्ना कनपिलवाड वय ५६ वर्ष, रा. मांडवा ता. किनवट जि. नांदेड, गणेश भिकू जाधव वय ३६ वर्ष, रा.आंबाडी ता. किनवट जि. नांदेड, महेंद्र नारायणराव गंदमवार वय ४७ वर्ष, रा. किनवट वेलमापुरा ता. किनवट जि. नांदेड, प्रल्हाद लक्ष्मण शिंदे वय ४२ वर्ष, रा. दाभाडे नगर किनवट ता. किनवट जि. नांदेड, असद खान मेहबुब खान वय ५६ वर्ष, रा. शिवाजीनगर किनवट ता.किनवट जि. नांदेड, राम जयराम राठोड वय ५५ वर्ष, रा. मलकापूर ता. किनवट जि.नांदेड, रंगराव हिरामण राठोड वय ५० वर्ष, रा. बेंडीतांडा ता. किनवट जि. नांदेड, मुकेश प्रभाकर जाधव वय ५० वर्ष, रा. रामनगर ता. किनवट जि. नांदेड, दिपक शेषराव बोबले वय ५० वर्ष, रा. खरबी ता. उमरखेड जि. यवतमाळ असे ५२ पत्ते जुगार खेळत असतांना मिळून आले. त्याची अंगझडती तसेच सदर ठिकाणारवरुन एकूण ४ लाख १७ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई करिता दराटी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात स.पो.नि.धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, पोहवा मुन्ना आडे, पोहवा संतोष भोरगे, पोहवा तेजाब रणखांब, पोहवा सुभाष जाधव, पोहवा कुणाल मुंडोकार, पोहवा रमेश राठोड, पोशि सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र शिरामे, पोशि राजेश जाधव सर्व नेम–स्थानिक गुन्हे शाखा यांच्या पथकाने केली.

## आषाढी एकादशी निमित्त भाविकांना फराळाचे वाटप

### शिवसेना तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांचा उपक्रम



दैनिक आपला विदर्भ

**सावळदबारा/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीनिमित्त सावळदबारा येथील विठ्ठल रखुमाई मंदिरावर परिसरातील हजारो भाविकांनी दर्शनासाठी हजेरी लावली. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्यावतीने भाविकांना केळी व इतर फराळाचे वाटप करण्यात आले.

आषाढी एकादशी निमित्त सावळदबारा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे सकाळपासून हजेरी लावून भाविक भक्तांनी दर्शन घेतले.यावेळी भाविक भक्तांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्याकडुन केळीचे वाटप करण्यात आले. तसेच भाविकांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्याचबरोबर इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विठ्ठल रुक्मिणी यांच्या दर्शनासाठी आलेल्या यावेळी सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते, दिनकर शिपल्कर, रमेश महाराज खराटे, नरेश देशमुख, राजु खिरडकर,राजु कान्हारे,गोपाल सपकाळ, शंकर खराटे, योगेश साळुके, पवन बोबडे, सोपान खडके,जानकीराम खराटे, सुमित ढोकणे. हर्षल सपाटे आदींची उपस्थिती होती.

## वारकऱ्यांच्या बसला अपघात, १५ वारकरी जखमी : चिखली शहराजवळील घटना

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पंढरपूर येथून विठुरायाचे दर्शन घेऊन गावी निघालेल्या भाविकांच्या एसटी बसला ७ जुलै रोजी पहाटे बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहराजवळ अपघात झाला.चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्ता दुभाजकाला धडकून उलटली, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.मात्र, १५ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. पांडुरंगाची कृपेने मोठा अनर्थ टळला. अशी भावना गावी परतणाऱ्या वारकऱ्यांनी व्यक्त केली.




आषाढीला पांडुरंगाचे दर्शन घेतल्यानंतर आपल्या घराकडे निघाले होते. खामगाव आगाराची एसटी बस क्र. एम.एच. ४० वाय ५८३० पंढरपूरहून ५२ भाविकांना घेऊन परतीच्या मार्गावर होती.पहाटे सुमारे पावणेदोनच्या सुमारास, चिखली शहरातील महाबीज प्रक्रिया केंद्रासमोर चालकाचे बसवरील नियंत्रण अचानक सुटले.त्यामुळे वेगात असलेली बस थेट रस्त्याच्या मधोमध असलेल्या दुभाजकाला धडकली आणि पलटी झाली. रात्रीची वेळ असल्याने आणि बहुतांश प्रवासी झोपेत असल्याने बसमध्ये मोठा गोंधळ उडाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बसमधील जखमी प्रवाशांना बाहेर काढून तातडीने चिखली आणि बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमी झालेल्या १५ प्रवाशांची प्रकृती स्थिर असल्याचे माहिती समोर आली आहे. पंढरीच्या पांडुरंगामुळे आमचा जीव वाचला. अशी भावना यावेळी अपघातातील वारकऱ्यांनी व्यक्त केली

## कृतज्ञतेच्या अश्रूंनी भरलेला एक अविस्मरणीय दिवस...

# नायगाव दत्तापूर : शेंदला गावात शिक्षकांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात पार पडला!

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** ‘‘शिक्षक‘‘ या शब्दामध्ये संपूर्ण समाजाचा पाया दडलेला असतो. समाज घडवणाऱ्या, माणसं घडवणाऱ्या या ज्ञानदीपांचा गौरव करणे म्हणजे संस्कृतीचा सन्मान करणे. अशीच एक कृतज्ञतेने ओथंबलेली, भावनांनी भरलेली, आणि प्रेमाने नटलेली सेवापूर्ती व नागरी सत्कार समारंभाची सकाळ शेंदला गावाने अनुभवली. जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, मोहना खुर्द येथील मुख्याध्यापक मा. राजीव गोपाळराव रहाटे सर यांच्यासह दत्तात्रय राहाटे सर, विलास राहाटे सर, रमेश इंगोले सर आणि सखाराम राहाटे सर,श्रीमती उषाताई रहाटे यांचा सेवानिवृत्ती गौरव समारंभ शेंदला येथे अतिशय उत्साहात पार पडला.



कार्यक्रमात शेकडो माजी विद्यार्थी, गावकरी, शिक्षक, आणि मान्यवर उपस्थित होते. आपले गुरू आज सेवानिवृत्त होत आहेत ही भावना डोळ्यांत पाणी आणणारी होती, पण त्यांच्या सेवेचा गौरव करताना सर्वांच्या चेहऱ्यावर अभिमानाचं तेज होतं. कार्यक्रमात शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व भेटवस्तूंनी सपत्नीक सत्कार करण्यात आला. अतिथींचा सन्माननीय सहभाग मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मधुकर मामा राहाटे,प्रमुख अतिथी राजाभाऊ राहाटे, प्रल्हाद राहाटे, सरपंच ज्योतीताई राहाटे,गणपतराव रहाटे, श्यामभाऊ राहाटे, अजित राहाटे सर,गजानन भाऊ रहाटे, गजानन खिल्लारी सर,डॉ.धैर्यशील रहाटे,शालीग्राम रहाटे तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी यांची उपस्थिती विशेष भावनिक ठरली. कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रमेश नालेगांवकर सर यांनी करत आयोजन व नियोजनाचे विस्तृत वर्णन केले. गणेश राहाटे सर यांच्या प्रभावी सूत्रसंचालनाने वातावरण भारून गेले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दिपक ठोकरे सर यांनी हृदयपूर्वक केले.

गौरव करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग डॉ. कैलास मुळे, प्रा.रमेश नालेगांवकर, संदीप राहाटे, दिपक ठोकरे,श्रीकृष्ण रहाटे सर,प्रा. निलेश बाजड,प्रा.विठ्ठल ताटर ,अनिल चोपडे, गणेश राहाटे, सतिश शेळके, विनोद इंगळे, प्रा.परमेश्वर चनखोरे, विष्णू बचाटे ,विष्णू राहाटे, विलास राजेकर,धनंजय राहाटे, डॉ.कालिदास गाडेकर,गजूनाना रहाटे,देविदास रहाटे,सुभाष खरात ,प्रमोद रहाटे ,दिपक गाडेकर ,विकास डव्हळे,केशव रहाटे ,सचिन रहाटे ,दत्ता चोपडे ,शरद नालेगांवकर व सर्व समस्त शनेश्वर संस्थानचे सदस्य आदी माजी विद्यार्थ्यांनी तसेच सत्कार समितीने कार्यक्रमासाठी निस्सीम मेहनत घेतली.

वक्त्यांच्या शब्दांतून उमलले शिक्षकांचे महात्म्य विविध मान्यवर वक्त्यांनी सेवानिवृत्त शिक्षकांच्या कर्तव्यनिष्ठ सेवा, विद्यार्थ्यांवरील प्रेम, आणि समाजासाठी केलेल्या योगदानावर प्रकाश टाकला.

काही क्षण तर असे आले की, मंचावरील आणि प्रेक्षकांतील डोळ्यांत अश्रू लुकलुकले... पण ते होते कृतज्ञतेचे, सन्मानाचे, आणि प्रेमाचे. हा कार्यक्रम केवळ एका सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार नव्हता... हा होता गुरू या नात्याचा सन्मान, एका युगाचा निरोप, आणि शब्दांमध्ये व्यक्त न होणाऱ्या कृतज्ञतेचा साक्षात उत्सव!